# मिरा भाईंदर महानगरपालिका

**आस्थापना विभाग**
**जा.क्र.मनपा/आस्था/** 995 /2021
**दि.** 30/07 /2021

**परिपत्रक**

**विषय :- महापालिका मुख्यालयात प्रवेशासंबंधी सूचना.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्यालयाच्या सुरक्षा व्यवस्थेत सुसूत्रता आणण्याकरीता महापालिका मुख्यालयात प्रवेश करणेसाठी खालीलप्रमाणे सूचना पारित करण्यात येत आहेत.

1) महापालिका मुख्यालयातील प्रवेशद्वार क्रमांक 1 येथून मा.महापौर व मा.पदाधिकारी, महापालिका आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, शहर अभियंता तसेच महापालिकेचे सर्व अधिकारी/ कर्मचारी यांचे वापरातील दोन, तीन व चार चाकी (महापालिका/ शासकीय) वाहनांना फक्त प्रवेश अनुज्ञेय राहील. या व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही वाहनांना प्रवेश अनुज्ञेय राहणार नाही. मा.सदस्य यांना वाहनासह व वाहनांशिवाय प्रवेशद्वार क्रमांक 1 येथून प्रवेश अनुज्ञेय राहील.
2) महापालिका मुख्यालय प्रवेशद्वार क्रमांक 1 मधून प्रवेश करणारी सर्व वाहने ही प्रवेशद्वार क्रमांक 2 मधूनच बाहेर पडतील याची दक्षता सुरक्षा यंत्रणेने घ्यावयाची आहे.
3) मुख्यालयातील प्रवेशद्वार क्रमांक 2 येथून महापालिका अधिकारी/कर्मचारी तसेच पत्रकार व नागरिक यांना पायी प्रवेश अनुज्ञेय राहील.
4) नागरिकांसाठी प्रवेशद्वार क्रमांक 2 येथे कक्ष उभारण्यात आला असून, सदर कक्षामधून नागरिकांना महापालिका मुख्यालयात प्रवेश करण्यासाठी प्रवेशपत्र उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर प्रवेशपत्र प्राप्त करुनच नागरिकांना महापालिका मुख्यालयात प्रवेश अनुज्ञेय राहील. एका प्रवेशपत्रावर जास्तीत जास्त दोन व्यक्तींनाच प्रवेश देण्यात येईल.
5) नागरिकांना आठवडयाच्या दर सोमवार ते शुक्रवार या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी मुख्यालयात सकाळी 10.30 ते 01.30 या वेळेत तसेच पत्रकार यांना सकाळी 10.30 ते दुपारी 03.00 वाजेपर्यंत प्रवेश अनुज्ञेय राहील.
6) महापालिका मुख्यालयात प्रवेश करतेवेळी महापालिका अधिकारी/ कर्मचारी, महापालिका कंत्राटदार, कंत्राटी काम करणारे सर्व कर्मचारी, पत्रकार यांनी ओळखपत्र धारण करणे बंधनकारक राहिल. कंत्राटदार यांनी त्यांचे अधिनस्त कार्यरत कामगारांना त्यांचे कंपनीची ओळखपत्र द्यावीत. ओळखपत्राशिवाय अधिकारी/ कर्मचारी यांना मुख्यालयात प्रवेश दिला जाणार नाही.
7) कार्यालयीन वेळेनंतर जे नागरीक कामकाजासाठी महापालिका मुख्यालयात येत असतात त्यांना मा.महापौर व मा.पदाधिकारी, यांच्या स्वियं सहाय्यकाच्या परवानगीने प्रवेश अनुज्ञेय राहील.

सर्व संबंधित विभागप्रमुख/खातेप्रमुख यांनी सदरच्या सूचना त्यांचे अधिनस्त कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणून द्याव्यात. सर्व सन्माननीय लोकप्रतिनिधी, महापालिका अधिकारी/कर्मचारी, पत्रकार, कंत्राटदार व इतर नागरिक यांनी उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. अन्यथा या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कार्यवाहीस संबंधित अधिकारी/कर्मचारी जबाबदार राहतील.

**(दिलीप ढोले)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,** अंमलबजावणीस्तव,
अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त (सर्व), विभागप्रमुख/ खातेप्रमुख (सर्व)

**प्रत**:- मा.महापौर, मा.उप-महापौर, मा.सभापती-स्थायी समिती,
मा.सभागृह नेते, मा.विरोधी पक्ष नेते यांचेकडे माहितीसाठी.